# प्रकरण पाचवे

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

# प्रकरण पाचवे
# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

**५.० प्रस्तावना**

**५.१ संशोधनाचा सारांश**

- ५.१.१ व्यवस्थापन संकल्पना
- ५.१.२ शैक्षणिक व्यवस्थापन व शालेय व्यवस्थापन
- ५.१.३ दूरस्थ शिक्षण
- ५.१.४ शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमाचे विकसन
- ५.१.५ शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम
- ५.१.६ समस्येचे विधान
- ५.१.७ संशोधनाची उद्दिष्टे
- ५.१.८ संशोधनाची गृहितके
- ५.१.९ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा
- ५.१.१० संशोधनाची गरज व महत्त्व

**५.२ प्रकरण दुसरे - संबंधित संशोधन व साहित्याचा अभ्यास**

**५.३ प्रकरण तिसरे - संशोधनाची कार्यपद्धती**

- ५.३.१ प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड

**५.४ प्रकरण चौथे**

**५.५ प्रकरण पाचवे - सारांश, निष्कर्ष व शिफारशी**

**५.६ निष्कर्ष**

**५.७ शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पूर्ण करणा-या अध्ययनार्थी कडून भरून घेतलेल्या प्रश्नावलीवरून काढलेले निष्कर्ष**

- ५.७.१ शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम चालविणा-या अभ्यासकेंद्रावरील समन्वयकाच्या मुलाखतीवरून काढलेले निष्कर्ष

**५.८ शिफारशी**

- ५.८.१ शासनासाठी शिफारशी
- ५.८.२ मुक्त विद्यापीठासाठी शिफारशी
- ५.८.३ अभ्यासकेंद्रासाठी शिफारशी

**५.९ पुढील संशोधनासाठी विषय**

# प्रकरण पाचवे

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

## ५.० प्रास्ताविक

शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. या पदवीसाठी प्रस्तुत शोधनिबंधाचे कार्य केले आहे. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम दूरस्थ मार्गाने कसा चालतो याचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत संशोधन कार्य केले आहे.

यामध्ये शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची माहिती, अध्ययनार्थीनी हा शिक्षणक्रम पूर्ण केल्यास त्यांना कसा उपयोग होतो, शिक्षणक्रमाची परिणामकारकता व दूरस्थ शिक्षणाच्या दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास करण्याचा पयत्न संशोधिकेने केला आहे.

यासाठी महाराष्ट्रातील पुणे व कोल्हापूर विभागातील शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम एकुण ११ अभ्यासकेंदावरील विद्यार्थाकडून भरून घेतलेल्या प्रश्नावली व समन्वयकांच्या मुलाखतीवरून शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची उपयोगीता अभ्यासली आहे.

## ५.१ संशोधनाचा सारांश

आज सर्वच क्षेत्रात प्रचंड स्पर्धा वाढली आहे. आजचे ज्ञान उदया कालबाह्य होत आहे म्हणून या युगात टिकाव लागण्यासाठी व्यवस्थापनाचा शास्त्रशुद्ध विचार केला पाहिजे. अनुभवाने व्यवस्थापन कौशल्य विकसित होऊ शकते. स्थलकालानुसार व्यवस्थापनाची तत्त्वे बदलत असतात. तांत्रिक व वैज्ञानिक प्रगतीमुळे व्यक्तीच्या क्षमता वाढल्या त्या क्षमतांना व्यवस्थापनाची जोड दिल्यास कामे अधिक पद्धतशीर होतील आपल्याकडे असलेल्या क्षमता लक्षात घेऊन विचारपूर्वक व्यावहारिक, वास्तव कामाचा विचार करता आला पाहिजे बुद्धी, ज्ञान, अनुभव, निरीक्षणशक्ती व प्रयत्न यासगळयांना व्यवस्थापनाची जोड मिळाल्यास काम अधिक चांगले होते.

### ५.१.१ व्यवस्थापन संकल्पना

एखादे कार्य, व्यवहार किंवा चळवळ प्रभावी रीतीने घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेली कार्ये ज्या यंत्रणेकरवी केली जातात त्या यंत्रणेला व्यवस्थापन असे म्हणतात.

### ५.१.२ शैक्षणिक व्यवस्थापन व शालेय व्यवस्थापन

व्यवस्थापनची तत्त्वे जेव्हा विशिष्ट क्षेत्राच्या संदर्भात लागू केली जातात त्यावेळी त्यास त्या क्षेत्राचे व्यवस्थापन असे म्हणतात. तर याच न्यायाने व्यवस्थापनाची तत्त्वे ज्यावेळी शिक्षणक्षेत्राच्या संदर्भात लागू केली जातात त्यास शैक्षणिक व्यवस्थापन असे म्हणतात.

सध्याच्या काळात सर्वच क्षेत्रात व्यवस्थापनाची आवश्यकता निर्माण झालेली आहे. आज शिक्षण हा देखील एक उद्योग मानला गेला आहे. त्यामुळे या क्षेत्रातदेखील इतर क्षेत्रातील उद्योग-व्यवसायाप्रमाणेच उत्कृष्ट व्यवस्थापन असणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात देखील 'ध्येयधोरणे,उद्दिष्टे निश्चिती, नियोजन, सुसूत्रीकरण, संचालन, नियंत्रण अशा अनेक बाबींचा समावेश असतो. तसेच शिक्षक, विद्यार्थी, पालक, समाज व इतर व्यक्ती हे मानवी घटक व आवश्यक भौतिक घटक शिक्षणक्षेत्रात समाविष्ट असतात. त्यामुळे या क्षेत्रासही उत्कृष्ट व्यवस्थापनाची आवश्यकता आहे.

### ५.१.३ दूरस्थ शिक्षण

मानवाच्या जिज्ञासूवृतीमूळे ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्या, निरनिराळया वैज्ञानिक शोधामुळे नवनवीन ज्ञान उपलब्ध झाले. मानवाला ते ज्ञान व कौशल्य मिळविणे अत्यावश्यक ठरला. परंतु वेळे अभावी नोकरी व्यवसाय सांभाळून तो आपल्या शिक्षणाची लालसा पारंपारिक पद्धतीने भागवू शकत नव्हता. आधुनिक माध्यमाद्वारे प्रभावी संप्रेषण शक्य झाल्याने दूरस्थ शिक्षण ही संकल्पना उत्क्रांत होऊन या कल्पनेचा उदय झाला. दूरस्थ शिक्षण मूलतः अशांसाठी आहे की ज्या व्यक्ती विभिन्न कारणांनी शिक्षण घेऊ शकत नाहीत, त्यांना शिक्षणाची संधी देऊन शिक्षणाची साधने उपलब्ध करून देणे. यात शिक्षक आणि विद्यार्थी एकमेकापासून दूर राहून शिक्षण हा पत्राद्वारे, दूरध्वनीद्वारे, दृकश्राव्य साधनांद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असतो आणि विद्यार्थी आपली नोकरी करून, व्यवसाय सांभाळून घरच्याघरी अभ्यासकरून ज्ञानकौशल्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. सुरूवातीच्या काळात वेगवेगळया तज्ज्ञांनी दूरस्थशिक्षणासाठी विविध पारिभाषिक शब्दाचा अवलंब केला ते निरनिराळया नावाने ओळखले जाते.

### ५.१.४ शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमाचे विकसन

शाळेत मुख्याध्यापकाची प्रमुख भूमिका असते. शाळेच्या नावापेक्षा शाळा मुख्याध्यापकाच्या नावांने ओळखली जावी असे प्रत्येक मुख्याध्यापकाला वाटते. पण त्यासाठी शालेय मार्गदर्शनाबरोबरच

आर्थिक आणि प्रशासकीय व्यवस्थापनात देखील सुसूत्रता असावयास हवी त्याचबरोबर मानवी संबंधाचे ज्ञान असणेही तेवढेच आवश्यक आहे. याबाबत केवळ दीर्घ अध्यापनाचा अनुभवच मुख्याध्यापक,

पर्यवेक्षक यांना उपयोगाचा नसून त्यासोबतच मानवी व्यवस्थापन, आर्थिक व्यवस्थापन, विद्यार्थी कल्याण आणि विद्यार्थी गुणवत्ता विकास यांचे ज्ञान असणेही अत्यंत आवश्यक असते. या सर्व बाबीसाठी मुख्याध्यापक आपल्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांवर व सहकाऱ्यांवर कमालीचे अवलंबून असतात. यामुळे बरेच कर्मचारी आवश्यक ती माहिती सहज उपलब्ध करून देत नाहीत. विद्यालयाचा प्रमुख म्हणून शिक्षकाला ज्या पद्धतीने मार्गदर्शन करतो त्याच पद्धतीने कर्मचा-याला मार्गदर्शन करणे तेवढेच गरजेचे आहे. ह्या सर्व दृष्टिकोनातून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने तज्ज्ञांच्या मदतीने शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचे विकसन केले आहे.

या शिक्षणक्रमामध्ये मुख्याध्यापक, पर्यवेक्षक आणि ज्येष्ठ शिक्षक यांना आवश्यक अशा मानवी, आर्थिक आणि प्रशासकीय व्यवस्थापनासाठी आवश्यक असणारी कौशल्ये,ज्ञान आणि काही क्लृप्त्यांचे खास वैशिष्ट्ये म्हणजे मुख्याध्यापक,उपमुख्याध्यापक आणि पर्यवेक्षक ह्यांना आधुनिक व्यवस्थापनची ओळख करून देणे, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक नवोपकम आणि प्रयोग करण्यासाठी मुख्याध्यापकांना प्रवृत्त करून त्यांच्यात प्रयोगशील दृष्टि निर्माण करणे, मुख्याध्यापकांना त्यांच्या शालेय व्यवस्थापनात आर्थिक व्यवस्थापनात नवनवीन कौशल्य वापरण्यास प्रवृत्त करणे त्यात सुसूत्रता आणि सातत्य निर्माण करण्यासाठी अभिवृत्ती व प्रेरणा निर्माण करणे ही होत.

शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम स्वयंअध्ययनावर आधारित असल्यामुळे दूरस्थ मार्गाने चालतो. या शिक्षणक्रमासाठी मुक्त विद्यापीठाने अंतिम लेखी परीक्षा ठेवली नाही. तर यासाठी स्वाध्याय व कृतिसंशोधन यासारख्या मूल्यमापनाच्या नव्या साधनांचा वापर केलेला आहे. या शिक्षणकमाचा कालावधी १ वर्ष आहे. त्यासाठी अभ्यासकेंद्रावर फक्त १० दिवसाचे संपर्कसत्र असते म्हणजे हा अभ्यासक्रमपूर्णत: दूरस्थ माध्यमांवर अवलंबून आहे. यासाठी संपर्कसत्रे, अभ्याससाहित्यसाठी स्वयंअध्ययन मुद्रित साहित्य, संपर्कसत्र, रेडिओ, दूरदर्शन, समंत्रण, संगणक, इंटरनेट, दूरपरिषद इ. दूरस्थ माध्यमांचा वापर करून हा अभ्यासकम पूर्ण करता येतो.

## ५.१.५ शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम

१. शैक्षणिक व्यवस्थापन : नवा दृष्टिकोन

२. शैक्षणिक व्यवस्थापन

३. कार्यालयीन व्यवस्थापन

४. शालेय आर्थिक व्यवस्थापन

५. शाळेची रचना व भौतिक सुविधा

६. विद्यार्थी कल्याण आणि गुणवत्ता विकास

७. शालेय व्यवस्थापनातील मानवी संबंधाचे व्यवस्थापन

अशा सात स्वयंअध्ययन पुस्तिका, स्वाध्याय, प्रात्यक्षिक, परिसंवाद, कृतिसंशोधन व मौखिक परीक्षा इ. चा वापर करण्यात येतो.

या शिक्षणक्रमात आपणास पुढील बाबीची सविस्तर माहिती मिळते.

**१. शैक्षणिक व्यवस्थापन : नवा दृष्टिकोन**

यामध्ये व्यवस्थापन म्हणजे काय?, त्याचे स्वरूप, विस्तार, व्यावसायिक शिक्षण, मुख्याध्यापक भूमिका, नेतृत्व, समग्र गुणवत्तेचे व्यवस्थापन.

**२. शैक्षणिक व्यवस्थापन**

यामध्ये शाळा एक प्रणाली, यथार्थदर्शी व समग्र नियोजन, शालेय कार्याच्या व्यवस्थापनाची विभागणी, अध्यापन,अभ्यासपूरक कार्यक्रम,शैक्षणिक मूल्यमापन काही उदाहरणे व विशेष शाळांचे व्यवस्थापन

**३. कार्यालयीन व्यवस्थापन**

यामध्ये कार्यालयातील भौतिक घटकांचे व्यवस्थापन, शालेय पत्रव्यवहार, शाळेच्या कार्यालयाची कार्यपद्धती बाह्य तपासणी पूर्वी करावयाची कामे,शालेय व्यवस्थापनाशी संबंधीत नियमांचा अभ्यास.

**४. शालेय आर्थिक व्यवस्थापन**

यामध्ये आर्थिक व्यवहार,जमेच्या बाबी,अर्थनियोजन,अर्थव्यवहाराच्या नोंदी,अर्थव्यवहार नियंत्रण,शाळेच्या विकासासाठी निधी,आर्थिक व्यवस्थापनासाठी नियोजन इ.

५. **शाळेची रचना व भौतिक सुविधा**

यामध्ये शालेय इमारत व सुविधा यांच्या अधिकतम वापराची योजना व कार्यक्रम परिसर विकास,आर्थिक तरतूद,नित्यदेखभाल निगा या विषयी विविध योजना,उपलब्ध साधने आणि सुविधांच्या परिणामकारक वापराची गरज.

६. **विद्यार्थी कल्याण आणि गुणवत्ता विकास**

यामध्ये विद्यार्थी प्रवेश, विद्यार्थ्यांसाठी सुविधा, त्यांच्या क्षमतेनुसार मार्गदर्शन, शालेयशिस्तीसाठी प्रयत्न, शुल्क, सवलती, शिष्यवृत्या, विविध पारितोषिके आणि त्यासाठी करावयाची कार्यवाही.

७. **शालेय व्यवस्थानातील मानवी संबंधाचे व्यवस्थापन**

शिक्षक सहकार्यांशी संबंध, पालक व अन्य अशासकीय सेवाभावी संस्थेसोबत मानवी संबंध, मुख्याध्यापकांचे वैधानिक अधिकार,जबाबदा-या आणि कर्तव्ये,शाळा व समाज यांचा परस्पर संबंध दृढ करण्यासाठी विविध उपकम इ.

अशा सात स्वयंअध्ययन पुस्तिकेच्या साहय्याने हा शिक्षणक्रम किमान एक वर्षात पूर्ण करता येतो (हा अभ्यासक्रम एका वर्षात पूर्ण न केल्यास किमान तीन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करावा लागतो.)

## स्वाध्याय लेखन

स्वाध्याय लेखनाने अध्ययनार्थींच्या विचारांना अधिक प्रगल्भता येते,लिखानाचा वेग वाढतो, विचार प्रकियांना चालना मिळते,विषयांची गोडी निर्माण होते,स्वाध्यायातून विद्यार्थ्यांचे आकलन,संकलन आणि प्रगटीकरण क्षमतेचे मूल्यमापन होते.यादृष्टीने आणि पद्धतीने स्वाध्यायांची रचना विद्यापीठाने केलेली आहे.प्रत्येक पुस्तकांचे दोन स्वाध्याय देण्यात आले आहे.

## प्रात्यक्षिके

प्रात्यक्षिक लेखनामध्ये अध्ययनार्थी आपल्या शाळेकडे नव्यादृष्टिकोनातून पाहावे व त्यासाठी वेगवेगळया योजना कराव्यात या दृष्टिने प्रात्यक्षिकांची मांडणी केलेली आहे.

## परिसंवाद

शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाला प्रवेश घेणारे बहुतांशी प्रौढ अध्ययनार्थी हे शालेय किंवा अध्यापक विद्यालय पातळीवर अनेक वर्षापासून शैक्षणिक व प्रशासकीय कार्यात

आहे. त्यांच्याकडे प्रचंड अनुभवाचा साठा आहे. त्या अनुभवाचा उपयोग इतर प्रौढांना (सहध्यायीना) होण्यासाठी विद्यापीठाने परिसंवाद ही संकल्पना या शिक्षणक्रमात आणलेली आहे. प्रत्येक समंत्रकांनी एका तासात अभ्याक्रमाचा परिचय करून दिल्या नंतर प्रत्येक घटक समाजावून घेण्यासाठी परिसंवादाचे आयोजन केले आहे.

## कृतिसंशोधन

या शिक्षणक्रमासाठी कृतिसंशोधन प्रकल्प अनिर्वाय करण्यात आलेला आहे. या शिक्षणकमाच्या एक वर्षाच्या कालावधीत प्रत्येक प्रशिक्षणार्थीला आपल्या शाळेशी संबंधीत एक समस्या निश्चित करून तिच्यासंदर्भात कृतिसंशोधन करावे लागते. हे कृतिसंशोधन त्यांना अभ्यासण्यासाठी करावे लागते. हे कृतिसंशोधन त्यांना अभ्यासण्यासाठी देण्यात आलेल्या सात विषयांपैकी एका विषयांशी संबंधीत असणे आवश्यक असते. मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्य वेक्षक, शिक्षक यासारख्या प्रशिक्षणार्थीना ती संकल्पना समजावून त्यांचेकडून कृतिसंशोधन कार्य पूर्ण करून घेणे.

## मौखिक परीक्षा

संयुक्त मौखिक परीक्षेत अध्ययनार्थीने वर्षभर केलेल्या सर्व कार्याचा आढावा घेणे. यासाठी स्वाध्याय, पाठयपुस्तके, कृतिसंशोधन प्रकल्प आणि शिक्षणक्रमावर प्रश्न विचारले जातात. अध्ययनार्थीने शिक्षणक्रमाचा सूक्ष्मपणे अभ्यास केलेला आहे किंवा नाही यार्चीही मौखिक परीक्षेद्वारे तपासणी करण्यात येते.

याप्रमाणे हा शालेयव्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पूर्ण करण्याची सोय मुक्त विद्यापीठाने केलेली आहे व प्रत्येक स्वाध्याय, प्रात्यक्षिक, परिसंवाद, कृतिसंशोधन मौखिक परीक्षा याला स्वतंत्र गुणदान करून मूल्यमापन केले जाते.

## ५.१.६ समस्या विधान

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी केलेले समस्येचे विधान पुढील प्रमाणे.

**"शालेय व्यवस्थापन पदविका दूरस्थ शिक्षणक्रमाचा चिकित्सक अभ्यास"**

(A Critical Study of the Diploma in School Management Progarmme through Distance Education)

## पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या

### शालेय व्यवस्थापन

व्यवस्थापन म्हणजे व्यक्तिविकास असून व्यवस्थापन हे वैयक्तिक प्रशासनही आहे. व्यवस्थापनाचा संबंध एखादे काम करवून घेण्याशी असतो. व्यवस्थापनाची वैशिष्टये १. व्यवस्थापन संस्थेच्या उद्दिष्टांशी निश्चित केले जाते. २. धोरण, नियम व तत्वे यांची निश्चिती करून स्थूल मानाने योजना केली जाते. ३. प्रशासनाच्या कार्यात व्यवस्थापनाने मार्गदर्शन करणे अपेक्षित असते.

शाळेच्या स्थैर्यासाठी व प्रगतीसाठी व्यापक व सामान्य स्वरूपाची कामे करणे व दुस-याकडून ती कामे प्रभावीपणे करवून घेण्यासाठी योजना तयार करणे यास व्यवस्थापन असे म्हणतात. संस्थेच्या दैनंदिन कामात व्यवस्थापन मंडळ हस्तक्षेप करित नाही (बी. आर. जोशी, २००७).

प्रस्तुत संशोधनामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने चालविलेला शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम यात शालेय व्यवस्थापन या अर्थाने ही संज्ञा वापरली आहे.

### दूरस्थ शिक्षण

"दूर शिक्षण ही शिक्षणाची एक अशाप्रकारची व्यवस्था असते की ज्यात शिक्षक व विद्यार्थी स्थळ आणि काळ या दोहोंच्या बाबतीत एकमेकांपासून दूर असतात. अनेक माध्यमांच्या अगर साधनांच्या साहृयाने शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवत असतात. आणि विद्यार्थी आपली अभ्यासातील प्रगती अशा माध्यमांच्या द्वारे शिक्षकाला कळवतात. दूर शिक्षणाचे माध्यम म्हणून पत्रव्यवहार, ध्वनीफित, व्ही. डी. ओ., इत्यादी बाबींचा वापर केला जातो. दूर शिक्षण व्यवस्थेत पारंपारिक वर्गपद्धती,शिक्षक विद्यार्थी एकत्र येणे पूर्ण वर्ज्य असते असे नाही. वर्षातून काही अल्प काळ शिक्षक विद्यार्थी एकत्र येत असतात. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरासन करणे हे शिक्षकाचे मुख्य काम असते. आवश्यकतेनुसार शिक्षक काही भाग विद्यार्थ्यांना शिकवू शकतात. पण मुख्यतः विद्यार्थ्यांना स्वतः अभ्यास करावा लागतो. दूर शिक्षणाचे वैशिष्टये म्हणजे शिक्षक व विद्यार्थी एकमेकांपासून दूर राहून अध्यापन अध्ययनाचे काम करीत असतात. ( बी. आर. जोशी, २००७)

प्रस्तुत संशोधनामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने चालविलेला शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम हा ज्या माध्यमातून शिकविला जातो ते म्हणजे दूरस्थ शिक्षण होय.

**पदविका**

" पदविका हा अभ्यासक्रम निम्नस्तरावर मानला जातो. पदविका ही पदवीपेक्षा दर्जाने लहान व औपचारिकरीत्या कागदावर पदविधारकाचे नांव, विषय, वर्ष इत्यादी मजकूर लिहून विद्यापीठ अगर संस्थाप्रमुक यांची सही व शिक्का घालून पदविका यशस्वी विद्यार्थ्यास दिली जाते. अशा त-हेने महाराष्ट्रात अध्यापन पदविका दिली जाते. ( सोहनी शं. कृ. १९९३)

प्रस्तुत संशोधनामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने चालविलेला शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम या पदविकेचा अभ्यास करण्यासाठी प्रशिक्षण या अर्थाने ही संज्ञा वापरलेली आहे.

## ५.१.७ संशोधनाची उद्दिष्टे

१. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची माहिती घेणे.
२. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची उपयुक्तता अजमावणे.
३. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.
४. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचा दूरस्थ शिक्षणाच्या दृष्टिकोनातून चिकित्सा करणे.

## ५.१.८ संशोधनाची गृहितके

१. शालेय व्यवस्थापन पदविकेसाठी प्रवेश घेतलेले शिक्षक अनुभवी आहे.
२. स्वयंप्रेरणेने सहभागी झालेले आहेत.
३. स्वयं अध्ययनासाठी शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम पूर्ण करण्याची त्यांच्यात क्षमता आहे.

## ५.१.९ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

सदरच्या संशोधनामध्ये संशोधिका यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने चालविलेलेला व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम दूरस्थ शिक्षणाच्या माध्यमातून कसा राबविला जातो याचा अभ्यास करणार आहे.

**समष्टी (Univarse)**

महाराष्ट्रातील शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम सुरू असणारी आठ केंद्रे औरंगाबाद, नांदेड, अमरावती, नागपूर, पुणे, मुंबई, कोल्हापूर व नाशिक या आठ विभागात २८८० प्रशिक्षणार्थी .

**जनसंख्या (Population)**

महाराष्ट्रातील आठ विभागापैकी पुणे व कोल्हापूर या दोन विभागाची निवड संशोधिकेने केली. या दोन विभागात ६६० प्रशिक्षणार्थी आहेत.

**नियंत्रित नमुना (Invited sample)**

प्रस्तूत संशोधनासाठी पुणे व कोल्हापूर सर्व ६६० प्रशिक्षणार्थीना प्रश्नावली देणार.

**स्वीकृत नमुना (Accepted sample)**

पुणे व कोल्हापुर विभागातील ६६० प्रशिक्षणाथ्र्यापैकी ६६० विद्याथ्र्यानी प्रश्नावली स्विकारली.

**माहिती निर्माण करणारा घटक (Data processing sample)**

पूणे व कोल्हापुर विभागातील ६६० प्रशिक्षणाथ्र्यापैकी ६00 प्रशिक्षनार्थीनी प्रश्नावली भरून दिल्यात.

**संशोधनाची व्याप्ती**

सदरच्या संशोधनामध्ये संशोधिका महाराष्ट्रातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने राबविलेला शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचा चिकित्सक अभ्यास करणार आहे.

**संशोधनाच्या मर्यादा**

१. प्रस्तुत संशोधन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम' महाराष्ट्रात सुरू असलेल्या औरंगाबाद, नांदेड, अमरावती, नागपूर, पुणे, मुंबई, कोल्हापूर व नाशिक या विभागापैकी पुणे व कोल्हापूर विभागापुरते मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधनात शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम दूरस्थ मार्गाने कसा चालतो याचा विचार केला आहे.

३. प्रस्तुत संशोधन सन २००६ - २००७ या शैक्षणिक वर्षातील शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पूर्ण करणा-या अध्ययनार्थींचाच विचार केला आहे.

## ५.१.१० संशोधनाची गरज व महत्त्व

आज पर्यंत आपण व्यवस्थापन हे नाव फक्त औद्योगिक क्षेत्रातच लावत होतो परंतु शाळेसारख्या शैक्षणिक कार्य व समाज घडविण्या-या संस्थेचे व्यवस्थापन तितकेच महत्वाचे आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबरोबरच शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचावणे हेही शासनाचे उद्दिष्ट आहे. या दृष्टिकोनातून राज्यातील मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापकांना त्यांची जबाबदारी अधिक चांगल्यारीतीने पार पाडण्यासाठी शासनाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने तयार केलेला एक वर्षाचा 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम' शैक्षणिक वर्ष २००४ पासून नियुक्त होणा-या उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापकांना पुढील पाच वर्षात सदर अभ्यासकम पूर्ण करणे बंधनकारक केला आहे.

प्रचलित शालेय व्यवस्थापन शिक्षणक्रम कसा चालतो? शालेय व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाची गरज, शासनाने मुक्त विद्यापीठामार्फत राबविलेले प्रशिक्षण, त्याची आवश्यकता काय? त्याची परिणामकारकता म्हणून संशोधिकेला शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचा जे दूरस्थमार्गाने चालतो त्याचा चिकित्सक अभ्यास करणे गरजेचे वाटले, यादृष्टिने संशोधनाची गरज व महत्व आहे.

## ५.२ प्रकरण दुसरे - संबंधित संशोधन व साहित्याचा अभ्यास

या प्रकरणात प्रस्तुत संशोधन समस्येच्या संदर्भात यापूर्वी कोणत्या स्वरूपाचे संशोधन कार्य झालेल्या याचा आढावा घेतला आहे. यामूळे संशोधन समस्येची व्याप्ती निश्चित करणे, संशोधनाचे उद्दिष्ट ठरविणे, न्यादर्श निवडणे, संशोधनाची साधने निश्चित करणे, कार्यपद्धती ठरविणे याबाबी सुलभ झाल्या.

शालेय व्यवस्थापन प्रशासन या विषयाचे संशोधन व साहित्याचा आढावा घेण्यात आला.

## ५.३ प्रकरण तिसरे - संशोधनाची कार्यपद्धती

प्रस्तुत संशोधन वर्तमान काळाशी निगडीत असल्याने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला.
या संशोधनासाठी शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणकम एकूण महाराष्ट्रात राबवित असलेल्या आठ विभागापैकी पुणे विभागातील ५ अभ्यासकेंद्रे व कोल्हापूर विभागातील ६ अभ्यासकेंद्राची निवड केली व हे संशोधन खालील टप्या नुसार पूर्ण केले.

१. प्रश्नावली व मुलाखत प्रश्न तयार केले व ते तज्ज्ञ मार्गदर्शकाकडून तपासून घेतले .

२. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेतली व समन्वयक मुलाखत घेऊन माहिती मिळवली.

३. माहिती विश्लेषण करून निष्कर्ष काढले.

४. निष्कर्षानुसार योग्य त्या शिफारशी केल्या आहेत.

## ५.३.१ प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड

संशोधिकेने प्रस्तुत शोधनिबंधाच्या संदर्भात माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला. संशोधनात सुगम यादृच्छिक नमुन्याची निवड करण्यात आली. लॉटरी पद्धतीने नमुन्याची निवड केली कारण महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने राबविलेला 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम' पुणे, मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, नाशिक, नांदेड या आठ विभागापैकी दोन विभागाची निवड करायची होती कोणत्याही प्रकारचा पक्षपात न होता प्रत्येक घटकाला न्यादर्शात अंतर्भूत होण्याची समान संधी मिळण्यासाठी लॉटरी पद्धतीने नमुना निवडण्यात आला.

पुणे आणि कोल्हापूर या दोन विभागातील पुणे येथील ५ अभ्यासकेंद्रे व कोल्हापूर येथील ६ अभ्यासकेंद्रावरील सर्व ६६० (१००%) विद्यार्थी संशोधनासाठी नमूना म्हणून निवडले आहेत. पुणे विभागातील १.शारदाबाई पवार शिक्षणशास्त्र महाविद्यालय,बारामती २.कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापुर ३.शिक्षणशास्त्र महाविद्यालय, क-हाड ४.दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर ५.आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा. प्रत्येक केंद्रावरील ६० विद्यार्थी एकुण ३०० विद्यार्थीसंख्या .

कोल्हापूर विभागात १.कर्मवीर हिरे कला,वाणिज्य व शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी २.राजमाता महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मिरज ३.शशिकांत गावडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पेडांबे. ४.बॅ.नाथ पै अध्यापक महाविद्यालय, कुडाळ ५.दादासाहेब मगदूम हायस्कुल, कोल्हापुर ६.कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर प्रत्येक केंद्रावरील ६० विद्यार्थी एकूण ३६० विद्यार्थीसंख्या अशा पुणे व कोल्हापूर अशी दोन्ही विभागातील एकूण ६६० विद्यार्थ्या कडून प्रश्नावली भरून घेतल्या आहेत. तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील

'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम' विभाग प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांची मुलाखत या शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमांसदर्भात घेतली.

**संशोधन साधने**

प्रस्तुत संशोधनात पुढील साधनांचा उपयोग केला

**१. प्रश्नावली**

'शालेय व्यवस्थापन पदविका दूरस्थ शिक्षणक्रमाचा चिकित्सक अभ्यास' हा संशोधनाचा विषय असल्यामुळे विद्यार्थी हा अभ्यासक्रम दूरस्थ मार्गाने कसा पूर्ण करतो त्याची उपयुक्तता व परिणामकारकता अभ्यासणे हा महत्त्वाचा घटक आहे. त्यासाठी बंधित प्रश्नावली व मुक्त प्रश्नावली अशा दोन्ही प्रकारानुसार प्रश्नावली तयार करून शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्या कडून भरून घेतल्या.

**२. मुलाखत**

'शालेय व्यवस्थापन पदविका दूरस्थ शिक्षणक्रम' चालवित असणा-या अभ्यासकेंद्रातील समन्वयकांची मुलाखत घेतली.

**५.४ प्रकरण चौथे** - या प्रकरणात संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

**५.५ प्रकरण पाचवे - सारांश, निष्कर्ष व शिफारशी**

या प्रकरणात प्रकरण निहाय सारांश देण्यात आला. संकलित माहितीच्या विश्लेषणावरून निष्कर्ष काढण्यात आलेत व त्याआधारे शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय सुचविण्यात आलेत.

**५.६ निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनात पुणे व कोल्हापूर विभागातील शालेय व्यवस्थापन पदविका दूरस्थ शिक्षणक्रमाचा चिकित्सक अभ्यासाच्या दृष्टीकोनातून शालेय व्यवस्थापन पूर्ण करणा-या अध्ययनार्थी कडून भरून घेतलेल्या प्रश्नावली व शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम चालविणा-या अभ्यासकेंद्र समन्वयकाच्या प्रत्यक्ष मुलाखती वरून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढले आहेत ते खालील प्रमाणे -

## ५.७ शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पूर्ण करणा-या अध्ययनार्थींकडून भरून घेतलेल्या प्रश्नावलीवरून काढलेले निष्कर्ष

१. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे व्यवस्थापनातील संकल्पनाची स्पष्टता होते.

२. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे अध्ययनार्थींना आधुनिक शैक्षणिक विचार प्रवाहाची ओळख होते.

३. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे अध्ययनार्थींना परिणामकारक व्यवस्थापनासाठी आवश्यक ज्ञान, अभिवृत्ती, कौशल्य विकसीत होतात.

४. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे अध्ययनार्थी शैक्षणिक नवोपक्रम व प्रयोग हाती घेतात.

५. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमातील कृतिसंशोधनामुळे अध्ययनार्थीची दैनंदिन समस्येकडे संशोधक दृष्टि वृद्धिगंत होते.

६. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम उद्दिष्टानुसार आहे.

७. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे अध्ययनार्थींना प्रभावी व्यवस्थापन करण्याचा आत्मविश्वास वाढतो.

८. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेणा-यांचा हेतू व्यवस्थापनातील बारकावे कळावे असा आहे.

९. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमास प्रवेश घेतांना अध्ययनार्थींना इंटरनेटमूळे अडचणी आल्यात हे स्पष्ट होते.

१०. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम प्रवेश फी संबंधी अध्ययनार्थी समाधानी असल्याचे स्पष्ट होते.

११. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या परिसंवादासाठी संदर्भ साहित्याचा वापर जास्त केल्याचे स्पष्ट होते.

१२. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात कृतिसंशोधन करीत असतांना समस्येवरून पुस्तकाची निवड केल्याचे स्पष्ट होते.

१३. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात अध्ययनार्थींना कृतिसंशोधन करीत असतांना कृतिसंशोधनासाठी पुरेसा वेळ देता येत नसल्यामुळे अडचणी आल्यात हे स्पष्ट होते.

१४. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात अध्ययनार्थींना कृतिसंशोधनाची संकल्पना स्पष्ट होते.

१५. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामध्ये कृतिसंशोधन करीत असतांना संपर्क सत्राव्यतिरिक्त अधिक मार्गदर्शन मिळाले हे स्पष्ट होते.

१६. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात अध्ययनार्थींना कृतिसंशोधनाचा प्रशासनात थोड्या प्रमाणात उपयोग होतो हे स्पष्ट होते.

१७. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे अध्ययनार्थी सर्व शैक्षणिक व्यवस्थापनातील उद्दिष्टे स्पष्ट होतात.

१८. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे अध्ययनार्थींना व्यवस्थापन व प्रशासन या दोन शब्दामधील फरक स्पष्ट होते.

१९. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे अध्ययनार्थींना व्यावसायिक विकास साधता येतो.

२०. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे अध्ययनार्थींना विद्यार्थी सेवा कल्याण आणि गुणवत्ता विकास या पुस्तिकेमुळे विद्यार्थ्यांच्या संदर्भात सर्व माहिती मिळते.

२१. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे अध्ययनार्थी आर्थिक व्यवहार कसा करावा त्यांच्या नोंदी कशा ठेवाव्यात याबाबतची पूर्ण माहिती मिळते हे स्पष्ट होते.

२२. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे अध्ययनार्थींना शाळेची रचना व भौतिक सुविधा कशा असाव्यात या बाबत पूर्ण कल्पना येते.

२३. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे अध्ययनार्थींना मानवी संबंधाच्या व्यवस्थापनाचे महत्व लक्षात येते.

२४. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पुरेसा आहे हे स्पष्ट होते.

२५. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमातील स्वाध्याय व प्रात्यक्षिक सर्व अभ्यासक्रमावर आधारित आहे हे स्पष्ट होते.

२६. शालेय व्यवस्थापन शिक्षणक्रमाचे स्वाध्याय व प्रात्यक्षिक लिहितांना संमंत्रनातून मार्गदर्शन होते हे स्पष्ट होते.

२७. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात आदर्श शाळा भेटीमुळे अध्ययनार्थींना नवीन उपकमाची ओळख होते. आदर्श शाळा पाहावयास मिळते व मुख्याध्यापकाचे नियोजन कसे असते हेही पाहावयास मिळते असे स्पष्ट होते.

२८. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमातील आदर्श शाळा भेटीत अध्ययनार्थींना शालेय उपकम व अभ्यासेत्तर उपकम आपल्या शाळेपेक्षा वेगळे वाटले हे स्पष्ट होते.

२९. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची मूल्यमापन पद्धती योग्य वाटते हे स्पष्ट होते.

३०. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात मूल्यमापन प्रकियेमध्ये मौखिक परीक्षेद्वारे कृतिसंशोधनाची तपासणी होते, सर्व पुस्तिकांचा अभ्यास होतो व व्यवस्थापन विषयक माहितीचे नेमके आकलन होण्यास मौखिक परीक्षा गरजेची आहे हे स्पष्ट होते.

३१. शालेय व्यवस्थापन मूल्यमापनामध्ये मौखिक परीक्षे ऐवजी लेखी परीक्षा असावी हे स्पष्ट होते.

३२. शालेय व्यवस्थापन पदविका चालविणा-या अभ्यासकेंदाकडून अध्ययनार्थींना मिळालेला प्रतिसाद उत्तम आहे.

३३. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम चालविणा-या अभ्यासकेंद्रातून मुख्याध्यापकाच्या कार्य व्यवस्थापनासंबंधी पूर्ण माहिती मिळते.

३४. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमास अध्ययनार्थींना प्रवेश देतांना सेवा विचारात घ्यावी असे स्पष्ट होते.

३५. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम संपर्कसत्राचा सध्याचा कालावधी कमी पडतो हे स्पष्ट होते.

### ५.७.१ शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम चालविणा-या अभ्यासकेंद्रावरील समन्वयकाच्या मुलाखतीवरून काढलेले निष्कर्ष

१. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम अभ्यासकेंद्र समन्वयक म्हणून अडचणी येत नाहीत हे स्पष्ट होते.

२. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम अभ्यासकेंद्रावर संपर्कसत्राचे आयोजन सुट्टीत मुक्त विद्यापीठाने दिलेल्या वेळापत्रकानुसार घेतात हे स्पष्ट होते.

३. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणकम शिक्षणक्रमाच्या संपर्कसत्राव्यतिरिक्त समन्वयक मार्गदर्शन करतात हे स्पष्ट होते.

४. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमातील स्वाध्याय व प्रात्यक्षिक व्यवस्थापनाची माहिती मिळविण्याच्या व उपयोजनात्मक विचार करण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे हे स्पष्ट होते.

५. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात कृतिसंशोधन समस्या निराकरण करणे व संशोधक दृष्टी वाढण्यास उपयुक्त आहे हे स्पष्ट होते.

६. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या मूल्यमापनातील मौखिक परिक्षेऐवजी लेखी परीक्षा असावी.

७. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात व्यवस्थापनात मुलभूत संकल्पना परिचय, आधुनिक शेक्षणिक व्यवस्थापन विचारप्रवाहाची ओळख, शिक्षणातील गुणवत्तापूर्ण, व्यवस्थापनाचा परिचय ही उद्दिष्टे या अभ्यासक्रमातून पूर्ण होतात. हे स्पष्ट होते.

८. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम परिसंवादामुळे अभ्यासक्रमाची ओळख होते, समस्येवर चर्चा होते आत्मविश्वास वाढतो हे स्पष्ट होते.

९. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम दूरस्थ मार्गाने चालतो हे स्पष्ट होते.

१०. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात संदर्भ साहित्य, वर्तमानपत्र इटरनेटचा वापर अध्ययनार्थी करतात हे स्पष्ट होते.

११. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम शासनाने सक्तीचा करणे योग्य आहे हे स्पष्ट होते.

१२. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमामुळे अध्ययनार्थीची नेतृत्व क्षमता वाढते हे स्पष्ट होते.

## ५.८ शिफारशी

संशोधिकेने हाती घेतलेल्या प्रस्तुत शोधनिबंधाच्या निष्कर्षावरून शैक्षणिक प्रक्रियेचे अविभाज्य अंग असलेले

### ५.८.१ शासनासाठी शिफारशी

१. शालेय व्यवस्थापन शिक्षणक्रमास प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना रजा देण्यात यावी.

२. शासनाने शिक्षणखात्यातील वर्ग- १ व वर्ग -२ च्या नेमणूकीच्या वेळी या अभ्यासक्रमाचा विचार करावा.

३. शालेय व्यवस्थापन शिक्षणक्रम पूर्ण करणा-या कर्मचा-याच्या सेवापुस्तिकेत नोंद होण्याबाबत विचार व्हावा.

### ५.८.२ मुक्त विद्यापीठासाठी शिफारशी

१. 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम' मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांना हा अभ्यासक्रम सक्तीचा असल्याने त्यांना प्रथम प्राधान्य दयावे व तसे माहितीपत्रकात नमूद करावे.

२. 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमातील' स्वाध्याय व प्रात्यक्षिकांची संख्या कमी करावी.

३. 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमातील' परिसंवाद सादरीकरणाचा वेळ वाढवावा.

४. 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम' च्या मूल्यमापनात मौखिक परीक्षे ऐवजी लेखी परीक्षा असावी.

५. 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात' कृतिसंशोधनाला जास्त तासिकांचे नियोजन करावे.

६. 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचे' अभ्यासकेंद्र शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयालाच द्यावीत.

७. 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमातील' अतिथी व्याख्यानात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रतिनिधींनी सहभागी व्हावे.

### ५.८.३ अभ्यासकेंद्रासाठी शिफारशी

१. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात मुक्त विद्यापीठाच्या वेळापत्रकांचा अवलंब व्हावा.

२. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचे संपर्क सत्र सलग घ्यावेत.

३. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात कृतिसंशोधनाचा विषय शक्यतो प्रशासनाच्या संदर्भात असावा.

४. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम आदर्श शाळा भेटीत प्रत्येक वेळी शाळा बदलावी.

### ५.९ पुढील संशोधनासाठी विषय -

या संशोधनाद्वारे जाणवलेल्या परंतू राहून गेलेल्या पुढील विषयावर संशोधन करता येईल.

१. 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम' राबविणा-या दोन अभ्यासकेंद्राचा तुलनात्मक अभ्यास

२. 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचा' निरीक्षण या संशोधन साधनाचा वापर करून उपयुक्तता व परिणामकारकता अभ्यासणे.

३. 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात' अध्ययनार्थीना येणा-या अडचणींचा अभ्यास.

४. 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम' समन्वयकांना येणा-या अडचणीचा अभ्यास.

५. 'शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम' पूर्ण केलेल्या व न केलेल्या प्रशासकांचा तुलनात्मक अभ्यास.